जागतिक बँक सहाय्यीत हवामान अनुकूल कृषी प्रकल्पास (Project on Climate Resilient Agriculture) 'तत्वत: मान्यता' प्रदान करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**शासन निर्णय क्रमांक : हअप्र-०७१६ /प्र. क्र. ८२ /राकृवियो कक्ष,**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक : ०७ जुलै, २०१६.**

**वाचा :**

१. शासन पत्र क्र. कृषीवि-३७१६/प्र. क्र.४२ (भाग-१) /८-अे, दिनांक : ०६ एप्रिल, २०१६.
२. वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, भारत सरकार, यांचे पत्र क्र. DO No ४/१/२०१६-FB-VII दि. ०९ मे, २०१६
३. शासन पत्र क्र. कृषीवि-३७१६/प्र. क्र.४२ (भाग-१) /८-अे, दिनांक : ०६ मे, २०१६.
४. वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, भारत सरकार, यांचे पत्र क्र. DO No ४/१/२०१६-FB-VII दि. १७ मे, २०१६
५. जागतिक बँकेचे पत्र दि. २४ मे, २०१६

**प्रस्तावना :-**

मागील काही वर्षांपासून पावसाचे असमान वितरण, पावसातील मोठे खंड, मान्सूनचे उशीरा होणारे आगमन, अवकाळी पाऊस व गारपीट इत्यादी समस्यांना राज्यास वारंवार तोंड द्यावे लागत आहे. परिणामस्वरुपी तीव्र दुष्काळ अथवा टंचाईसदृष्य परिस्थिती निर्माण होणे आणि त्यामुळे कृषी उत्पादनात व उत्पादकतेत मोठ्या प्रमाणावर घट होऊन कृषी विकासाचा दर लक्षणीयरित्या घटत आहे तसेच, घटत्या उत्पन्नामुळे शेतक-यांमध्ये तणावग्रस्तता वाढत असून त्यातून काही शेतक-यांनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल देखील उचलले आहे.

एकंदरीत अलिकडील काळातील हवामानातील सदर लक्षणीय बदलांमुळे राज्यातील कृषी क्षेत्रापुढे मोठी आव्हाने उभी रहात आहेत. सदर हवामान बदलानुकूल (Resilient) कृषी विकासाकरिता तसेच, प्रतिकूल परिस्थितीत शेतक-यांनी घटत्या उत्पन्नामुळे तणावग्रस्त न होता पूर्वीच्या सुस्थितीत ताबडतोब पुर्नस्थापित होता यावे म्हणून कृषी क्षेत्र व पर्यायाने शेतक-यांनी सक्षम व्हावे याकरिता उपाययोजना करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

त्यानुषंगाने राज्यात 'हवामान अनुकूल कृषी प्रकल्प (Project on Climate Resilient Agriculture)' जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने प्रामुख्याने विदर्भ व मराठवाडयातील निवडक दुष्काळग्रस्त गावांमध्ये तसेच विदर्भातील पुर्णा नदीच्या खोऱ्यातील खारपाण पट्टयातील निवडक गावांमध्ये राबविण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. सदर प्रकल्पाची केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या आर्थिक

कार्य विभागाने जागतिक बँकेच्या अर्थसय्याकरीता संदर्भांकीत दिनांक १७/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये शिफारस केली आहे. जागतिक बँकेने संदर्भांकित दिनांक २४.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकल्पाच्या आखणी व अंमलबजावणीसाठी राज्य शासनासोबत काम करण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुषंगाने 'हवामान अनुकूल कृषी प्रकल्प (PoCRA)' राबविण्यास शासनाची **'तत्वत: मान्यता'** प्रदान करण्याबाबत तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा आराखडा (Project Implementation Plan) तयार करणे आणि प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता 'प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (Project Management Unit)' स्थापना करण्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१. जागतिक बँकेच्या अर्थसय्याने 'हवामान अनुकूल कृषी प्रकल्प (PoCRA)' राज्यात राबविण्यास शासनाची **'तत्वत: मान्यता'** देण्यात येत आहे.

२. या प्रकल्पाचा अंमलबजावणी आराखडा (PIP) तयार करणे तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता मुंबई येथे प्रकल्प व्यवस्थापन कक्षाची (PMU) स्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर प्रकल्प व्यवस्थापन कक्ष भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली स्थापन करण्यास तसेच प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे तात्काळ प्रतिनियुक्तीने / बदलीने / कंत्राटी तत्वावर भरण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक असलेल्या एकूण निधीपैकी ७०% निधी जागतिक बँकेच्या अर्थसहाय्यातून व उर्वरीत ३०% निधी राज्य शासनाकडून उपलब्ध होणार आहे. सदर निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्षे उघडून निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा आराखडा (PIP) तयार करणे तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात येणाऱ्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षाच्या (PMU) उभारणीकरिता येणाऱ्या प्रशासकीय खर्चाकरिता (जागेचे भाडे व उपकर, फर्नीचर व अंतर्गत रचना, संगणक व अन्य कार्यालयीन उपकरणे, स्टेशनरी, वीज, दुरध्वनी, इंटरनेट, आवश्यक सेवा पुरवठादारांचे शुल्क, प्रकल्पांतर्गत घटक/उपघटकांची आवश्यकतेनुसार प्राथमिक स्वरुपात अथवा पथदर्शी तत्वावर अंमलबजवणी, अधिकारी / कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते तसेच, वाहन, POL व अन्य आस्थापना विषयक खर्च इ. करिता) आवश्यक निधी वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावा.

६. सदर प्रकल्पाचा प्राथमिक आराखडा सुमारे रुपये ४००० कोटी रक्कमेचा आहे तथापि सदर प्रकल्पाच्या कार्यान्वनासाठी स्थापन करण्यात येणारे प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील (PMU) अधिकारी व जागतिक बँकेचे अधिकारी यांच्याकडून प्रकल्पाचा आराखडा अंतिमत: निश्चित करण्यात आल्यानंतर सदर प्रकल्पाच्या अंतिम आराखड्यास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात यावी.

७. सदर प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठी प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकरीता (PMU) आवश्यक असलेल्या पदांच्या निर्मितीस तसेच भविष्यात निर्माण करावयाच्या पदांना मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने व तदनंतर यथावकाश मंत्रीमंडळाची मान्यता घेऊन सर्व पदांची निर्मिती करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या मान्यतेने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १३१/२०१६/व्यय-१, दिनांक ०३/०७/२०१६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०७०७१६०८०४७५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2016.07.07 16:12:46 +05'30'

**( श्रीकांत चं. आंडगे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मंत्री (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. मा. राज्यमंत्री (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५. अपर मुख्य सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे,
९. कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, जिल्हा अकोला,
१०.कुलगुरु, वसंतराव नाईक, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, जिल्हा परभणी,
११.विभागीय आयुक्त (औरंगाबाद / नाशिक/ अमरावती / नागपूर विभाग)
१२.जिल्हाधिकारी (सर्व)
१३.विभागीय कृषी सहसंचालक (सर्व)
१४.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (सर्व)
१५.कृषी आयुक्त, (अेजी १० सेल) महाराष्ट्र राज्य, पुणे (खर्च ताळमेळ शाखा),
१६.महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर,

१७.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

१८. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,

१९.वित्त विभाग (व्यय १ / बियुडी १३), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

२०.नियोजन विभाग ( कार्यासन १४३१), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,

२१.कक्ष अधिकारी, कार्यासन क्रमांक - २अे / ६अे / ७अे, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२२. निवड नस्ती.